डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

**कृषि विज्ञान केंद्र, लांजा, जि. रत्नागिरी**

जा.क्र./कृविके/ठेकामजूर/615 /२०२०  दिनांक :- 11 MAR 2020

## जाहीर नोटीस

**विषय :** कृषि विज्ञान केंद्र, लांजा प्रक्षेत्रावरील विविध विभागातील निर्धारीत कामे ठेका पध्दतीने करण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत....

कृषि विज्ञान केंद्र, लांजा प्रक्षेत्रावरील खालील विभागातील दि. ०१/०४/२०२० ते दि. ३०/०६/२०२० या कालावधीतील निर्धारीत कामे ठेका पध्दतीने करण्यासाठी इच्छूक ठेकेदारांकडून कामाच्या स्वरूपानुसार दरपत्रके मागविण्यात येत आहेत. इच्छूक ठेकेदारांनी ***कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, देवधे, ता. लांजा, जि. रत्नागिरी*** या नावे आपले दरपत्रक **दि. २७.०३.२०२०** पर्यंत या कार्यालयास सादर करावे.

**करावयाच्या कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | विभाग | करावयाच्या कामाचा तपशील | आवश्यक मजूर |
|---|---|---|---|
| ०१ | प्रक्षेत्र तसेच नर्सरी | सका. ०८ ते सायं. ०४ , सायं. ०४ ते रात्री १२ व रात्री १२ ते सका. ०८ — या वेळेत प्रक्षेत्राची राखण करणे तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०३ |
| ०२ | प्रक्षेत्र | ट्रॅक्टरने नागंरणी करून रोटाव्हेटर मारणे, शेणखत ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये भरून प्रक्षेत्रावर आणणे, भात, नागली, भुईमुग, आंबा बाटा तसेच इतर पिकांची पेरणी करणे. प्रक्षेत्रावरील लागवड करावयाच्या प्लॉटची बांधबदिस्ती/साफसफाई करणे, तसेच अनुषंगिक इतर खरिपपुर्व कामे कामे करणे. | ०३ |
| ०३ | प्रक्षेत्र | भात, नागली, भुईमुग, आंबा बाटा पेरणीसाठी गादी वाफे तयार करणे, काजु बी गोळा करणे, तसेच ती धुवून वाळविणे व पॅकींग करणे, प्रक्षेत्रावर उत्पादीत विविध बियाणे वाळविणे, काजु बी रूजत घालणे, तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०३ |
| ०४ | नर्सरी | कलमे/रोपे इ. ना पाणी घालणे, फवारणी/आळवणी करणे, फूट काढणे, तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०२ |
| ०५ | नर्सरी | काजु कलमे बांधणी करीता मातृवृक्ष बागेमधील झाडांवर डिफॉलीएशन करणे, कलम काडया काढणे, कलमे बांधणे. तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०३ |
| | | **एकूण** | **१४** |

**दरपत्रके सादर करण्यासंबंधीच्या अटी व शर्ती :—**

- दिलेली कामे कार्यालयीन वेळेतच पूर्ण करावयाचे आहे. ( सका. ०८ ते १२ व दुपारी ०२ ते ०५.४५ )
- दरपत्रकात प्रती मजूर प्रती दिवस या प्रमाणे मजूरीचा दर नमूद करावा.
- ठेका कामासंबंधीच्या सविस्तर अटी व शर्ती या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावणेत आल्या आहेत. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत कार्यालयास संपर्क साधावा. ( सका. ९.४५ ते ०१.३० व दुपारी ०२ ते ०६.१५ )
- कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व दरपत्रके नाकारण्याचे हक्क या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.

कार्यक्रम समन्वयक,<br>
कृषि विज्ञान केंद्र, देवधे,<br>
ता.लांजा (रत्नागिरी)

**प्रत प्रसिध्दीसाठी सस्नेह अग्रेषित :—**

१. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, दापोली

/— सदर पत्र विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे ही विनंती.

Scanned by CamScanner